# राम गांगुली - भाग २



१९४८ मध्ये ‘आग’ आला. ‘आग’मध्ये काही सुरेख गाणी होती. ‘काहे कोयल शोर मचाये रे’ (शमशाद), ‘जिंदा हूँ इस तरह के गम-ए-जिंदगी नही’ (खूप वाद्यमेळ असलेले मुकेशचे गाणे), ‘कही का दीपक कही की बाती’ (शमशाद आणि शैलेश), द्रुत गतीतील ‘रात को जी’ (मुकेश आणि शमशाद) आणि संथ गतीतील ‘ना आँखोमे आँसू ना होठोपे हाये’ (शमशाद) ही ती गाणी होत.

ह्यानंतर त्यांनी जवळजवळ दहा चित्रपटांना संगीत दिले परंतु ’गवैय्या’ (१९५४) वगळता इतर गाणी सुमार होती. परिणाम असा झाला की अंगी गुण असूनही प्रगती झाली नाही. १९५७ मध्ये पृथ्वीराज कपूर यांनी स्वनिर्मितीच्या ’पैसा’ या चित्रपटाचे संगीत राम गांगुलींना देऊन या संगीतकाराच्या कामात जान आणण्याचे प्रयत्न करूनही फारसा फरक पडला नाही. (’तुम मेरी राखो लाज हरी’ - गीता दत्त), ’दीपक’, ’संगम’ (१९५४. यामध्ये तलत, गीता, शमशाद, इ.) ’टेन-ओ-क्लॉक’ आणि अखेरचा चित्रपट ’साया’ (१९६१) ह्यापैकी कुठल्याही चित्रपटातील गाणी स्मरणात राहिली नाहीत.

पुढे त्यांचे काय झाले हे कुणालाच माहीत नाही, परंतु ’गवय्या’ (१९५४) चित्रपटात त्यांनी सुरेन्द्र याला बरीच गाणी दिली होती हे सिनेरसिकांच्या नक्कीच लक्षात असेल. या गायकाची ही बहुधा अखेरची गाणी असतील. परंतु ’गवय्या’तील सर्वांत सुंदर असलेले ’ऐसे टूटे तार की मेरे गीत अधुरे रह गये’

हे गाणे राम गांगुलींनी तलतला दिले. त्यांच्या संगीतजीवनाची तार अशीच तुटली का ?

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is
manekpremchand@gmail.com